महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्यातील प्रत्येक तहसील कार्यालयातून मिळणारे दाखले ऑनलाईन पध्दतीने मिळणेबाबत

(१) ६९११ (०४-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण तहसील कार्यालयातून तालुक्यातील ग्रामीण व शहरी नागरिकांना वैयक्तीक कामासाठी लागणारे उत्पन्न, जातीचे, नॉनक्रिमीलेअर, वय, अधिवास/राष्ट्रीयत्व जेष्ठ नागरिक, स्थानिक वास्तव्य इत्यादी स्वरुपाचे दाखले ऑनलाईन पध्दतीने देण्याचे माहे जानेवारी, २०१५ पासून सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील इतर सर्व तहसील कार्यायामध्ये ऑनलाईन पध्दतीने दाखले उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१८) : (१) होय, हे अंशत:खरे आहे.

कल्याण तहसिल कार्यालयातून तालुक्यातील ग्रामीण व शहरी नागरिकांना वैयक्तिक कामासाठी लागणारे विविध स्वरूपाचे दाखले सेतू सुविधा केंद्र व महा ई सेवा केंद्रा मार्फत माहे ऑगस्ट, २०१६ पासून ऑनलाईन पध्दतीने दिले जात आहेत.

(२) राज्यातील नागरिकांना विविध दाखले ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) यांनी दि.१९/०१/२०१८ रोजी आपले सरकार सेवा केंद्राबाबत केंद्र शासनाच्या CSC २.० अतंर्गत मार्गदर्शक सूचनासंबंधी शासन निर्णय निर्गमित केला आहे. यानुसार ग्रामीण व शहरी भागात लोकसंख्येच्या ठरलेल्या निकषानुसार आपले सरकार सेवा केंद्र स्थापन केली जात आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुबईतील गोंवडी, शिवाजीनगर या भागातील जरी काम करणा-या बाल मजूरांची सुटका करण्याबाबत

(२) १७०३५ (१४-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोवंडी, शिवाजीनगर, कुर्ल्यातील मिठी नदी काठी तसेच जरीमरी या भागात सध्या जरी काम करणा-या बालमजुरांची संख्या जास्त असून त्यांना दोनवेळच जेवण व त्यांच्या आई-वडीलांना दरमहा दीड हजार रुपये, जरीकाम करणा-या मालकांकडून देण्यात येत असून, जरी काम करणा-या बाल मजुरीकडे पोलीसांचे तसेच महिला व बाल कामगार विभागाचेही दुर्लक्ष होत असल्याचे या संबंधी काम करणा-या सामाजिक संघटनांनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आरोप केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोपांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी मा.राज्यमंत्री महिला व बालविकास यांनी दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी डोंगरी (मुंबई) येथील बालगृहाला दिलेल्या भेटीच्या वेळी बालकामगारांवर एकात्मिक बालसंरक्षण योजनेअंतर्गत विशेष लक्ष ठेवण्यात येईल असे जाहिर करुनही याप्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) : (१) व (२) मुंबईतील गोवंडी, शिवाजीनगर, कुर्ल्यातील मिठी नदी काठी तसेच जरीमरी या भागात जरी काम करणाऱ्या बालमजूरांबाबतची तक्रार कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडे माहे एप्रिल २०१५ वा त्यादरम्यान प्राप्त झालेली नाही.

तथापि, नियमित धाडसत्राअंतर्गत दिनांक ०६.०६.२०१५ रोजी मुंबईतील गोवंडी, शिवाजीनगर येथील जरी उद्योगातील एका बाल कामगारास मुक्त करण्यात आले असून दोषी मालकाविरुध्द एफ.आय.आर दाखल करण्यात आला आहे.

माहे जानेवारी, २०१७ ते जुलै, २०१७ या कालावधीमध्ये एकूण ३१ धाडसत्रे घेण्यात आली असून ३८ आस्थापनांमधून उपहार गृहातील १९ बालकामगार व इतर आस्थापनामधील ३९ बालकामगार अश्या एकूण ५८ बालकामगारांना मुक्त करण्यात आले आहे. यामध्ये जरी उद्योगाचा समावेश दिसून येत नाही.

(३) व (४) डोंगरी येथील बालगृह हे द चिल्ड्रन एड् सोसायटी, मुंबई यांचे अंतर्गत आहे. मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांनी सोमवार दिनांक २०.०४.२०१५ रोजी डोंगरी (मुंबई) येथील बालगृहाला दिलेली भेट व त्या अनुषंगाने दिलेल्या सूचनेनुसार १५६ बालकामगारांना स्वग्रामी पाठविण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात आलेली आहे.

राज्यात २०० सेवा ऑनलाईन करण्याची घोषणा

(३) ४४९३९ (१७-०५-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील हॉटेल ताज येथे ई.इंडिया महाराष्ट्र समिटच्या प्रसंगी मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २६ जानेवारी, २०१६ पर्यंत २०० सेवा ऑनलाईन करण्यात येतील अशी घोषणा केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनास सदर घोषणेची पूर्तता करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-१०-२०१८) : (१) होय.

(२) शासनाने अधिसूचित केलेल्या सेवा ऑनलाईन करण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण- २०१५/प्र.क्र.१२३/१८(र.व.का.), दि.२८/०९/२०१५ अन्वये कार्यपध्दती ठरविण्यात आलेली आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत शासनाकडून एकूण ३८ विभागाच्या ३८७ सेवा ऑनलाईन देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यातील ७७६ गावे ऑप्टिकल फायबर नेटवर्कने जोडण्याबाबत

(४) ५६०८० (२६-०८-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील ७७६ गावे येणाऱ्या माहे ऑगस्टपर्यंत ऑप्टिकल फायबर नेटवर्कने जोडण्याची राज्य शासनाची योजना असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूरला राज्यातील पहिला डिजिटल जिल्हा म्हणून नवी ओळख देण्याचा प्रयत्न करुन महाराष्ट्र दिनी जिल्ह्यातील पाच डिजिटल गावांचा शुभारंभ करण्यात आला, परंतु शुभारंभांची औपचारिकता संपल्यानंतर दोन तासांतच गावाचे नेटवर्क बंद पडले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१८) : (१) होय, केंद्र शासनाच्या National Optical Fiber नेटवर्क प्रकल्पांअंतर्गत BBNL या केंद्र शासनाच्या संस्थेद्वारे राबविण्यात येत आहे.
(२) अंशत: होय. तांत्रिक कारणास्तव ग्रामपंचायतीमध्ये नेटवर्क काही काळाकरिता बंद पडले होते.
(३) BBNL द्वारे नेटवर्क व्यवस्थित करण्याची कार्यवाही करण्यात आली.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शासकीय संकेतस्थळे असुरक्षित असल्याबाबत

(५) ६७५७६ (१०-०९-२०१७). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय संकेतस्थळे असुरक्षित असून रचना, सुसूत्रता यांबाबतचे निकष नसल्याचे माहे ऑगस्ट-२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत काही वर्षात वाढलेल्या सायबर हल्लेखोरांनी शासकीय संकेतस्थळांना लक्ष्य करत ती हॅक केल्याचे प्रकार घडल्याने शासकीय संकेतस्थळे सुरक्षित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१८) : (१) हे खरे नाही.
शासनाच्या संकेतस्थळांच्या बाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने निश्चित केलेल्या निर्देशांचे पालन करण्यात आल्याची व सुरक्षितता लेखापरिक्षणाद्वारे सुरक्षिततेची खातरजमा करण्यात आल्यानंतरच संकेतस्थळांचे होस्टींग करण्यात येते.
(२) प्रश्न उद्भवत नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही

राज्यातील प्रमुख शहरांमधील पोलिसांच्या शस्त्रांगाराची दुरवस्था झाल्याबाबत

(६) ७३८१४ (२०-०४-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.चंद्रदीप नरके (करवीर),

श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई शहर वगळता इतर प्रमुख शहरांमधील पोलिसांच्या शस्त्रांगाराची दुरवस्था झाली असून पोलिसांच्या ९०% शस्त्रांची समाप्ती तारीख उलटून १५ वर्षे झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर शस्त्रागारात शस्त्र तपासणी करणा-या तज्ञांची पदे सन १९९६ पासून रिक्त असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांसाठी नवीन शस्त्र खरेदी करण्याकरिता तसेच सदर रिक्त पदे भरण्याकरिता शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१८) : (१) महाराष्ट्र राज्य पोलीस दलामध्ये एकूण १,८९,३७४ नग शस्त्रे असून त्यापैकी कालबाह्य व मुदतबाह्य असे एकूण ७०,८५४ नग म्हणजे ३७.४१% शस्त्रे वगळता सध्या १,१८,५२० नग शस्त्रे महाराष्ट्र राज्य पोलीस दलामध्ये सुस्थितीत असल्याने वापरात आहेत.

(२) सदरची शस्त्रे इलेक्ट्रीकल, मॅकेनिकल असिस्टंट इंजिनिअर ऑफ स्मॉल आर्म्स या दर्जाच्या तज्ज्ञांकडून प्रमाणित करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत शस्त्रांची वार्षीक तपासणी त्याच धर्तीवर शस्त्र निरीक्षण शाखा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी यांचे मार्फत करण्यात येते.

(३) पोलीसांसाठी नवीन शस्त्र खरेदी करण्याची कार्यवाही सुरू असून नवीन शस्त्रे, दारूगोळा यांची खरेदी आवश्यकतेनुसार केली जाते.

पोलीस अधीक्षक, शस्त्र निरीक्षण शाखा, महाराष्ट्र राज्य, पुणे आस्थापनेवरील ०२ पोलीस उपअधीक्षक यांची रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्यात आली असून ०१ पोलीस उपअधीक्षक पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच पोलीस अधीक्षक, शस्त्र निरीक्षण शाखा, महाराष्ट्र राज्य, पुणे आस्थापनेवर ०९ आयुधिक पोलीस उपनिरीक्षक पदे मंजुर असून ०५ आयुधिक पोलीस उपनिरीक्षक कार्यरत आहेत व ०४ पदे रिक्त असून त्यांची भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरामध्ये अनेक आस्थापनांमध्ये बालमजूर कार्यरत असल्याबाबत

(७) ७४१६७ (२१-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती संगीता ठोंबरे (केज) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रथम कौन्सिल फॉर वलरेबल चिल्ड्रन्स (पीसीव्हीसी) तर्फे मुंबईतील २ लाख ३ हजार ४४५ दुकानांचे सर्वेक्षण करण्यात आले असून या सर्वेक्षणात ५०३ दुकानांमध्ये ५५१ बालकामगार काम करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान येथून अनाधिकृतरित्या बालमजुरांना आणुन १२ ते १८ तास धोकादायक कामे करवून घेतली जात आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, मालाड मालवणी,धारावी, कुर्ला,शाहूनगर शिवाजीनगर , बैंगणवाडी, कुरार विलेज, गोवंडी, आग्रीपाडा, ससून डॉक, आदि ठिकाणच्या कारखान्यांमध्येही लहान मुलांना कायमस्वरुपी कामाला लावून आठवड्याचे १०० रुपये दिले जातात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बालमजूरीच्या प्रश्नावर शासन गंभीर नसून दोषींवर फौजदारी करण्यात टाळाटाळ होत असल्याने ठाण्यातील महाराष्ट्र चाईल्ड डेव्हलपमेंट लेबर वेल्फेअर संस्थेने याबाबत जनहित याचिका दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,सदर मुलांना सोडविण्याच्या दृष्टीने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) : (१), (२), (३), (४), (५) व (६) प्रस्तुत बाल कामगारांच्या सर्व्हेक्षणाचे काम प्रथम कौन्सिल फॉर वलरेबल चिल्ड्रन्स (PCVC) या खाजगी अशासकीय संस्थेने स्वयंस्फूर्तीने हाती घेऊन त्याचा अहवाल शासनास अथवा कामगार आयुक्त यांना पाठविलेला नसून या संदर्भात सन्मा. वि.स.स. यांनी उक्त नमूद केलेला अतारांकित प्रश्न विचारल्यानंतर कामगार आयुक्त यांनी या संदर्भातील अहवाल सदर "प्रथम कौन्सिल फॉर वलरेबल चिल्ड्रन्स (PCVC)" या N.I.D. कडून प्राप्त करून घेतला. नियमीत धाडसत्रामध्ये मुंबई शहर विभागात जानेवारी,२०१७ ते एप्रिल,२०१७ या कालावधीत २२ धाडसत्रे आयोजित करण्यात आली होती. २३ आस्थापनांमधून १३ बाल कामगार (बिहार व उत्तरप्रदेश), ८ बाल कामगार (नेपाळ) तसेच १५ बाल कामगार (मुंबई) अशा एकुण ३६ बाल कामगारांची मुक्तता करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील हद्दबदल बाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस अधिक्षक व शहरी भागातील ५६ पुर्नरचनेचे अधिकार पोलीस आयुक्तांना देण्याबाबत

(८) ८८५०२ (०४-०९-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरी क्षेत्रातील लोकसंख्येत ग्रामीण भागातील स्थलांतरामुळे मोठ्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याने कायदा व सुव्यवस्थाचा प्रश्न हाताळण्यात समस्या निर्माण झाल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पोलीस ठाणे व पोलीस चौक्याच्या शहरी व ग्रामीण भागातील विशेषता पुणे शहर व जिल्ह्यातील हद्दीमधील छोटे-मोठे बदल करण्याचे अनेक प्रस्ताव दीर्घकाळापासून राज्य शासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दैनंदिन कामांमध्ये नागरिकांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास अनेकदा पुनर्रचना न झाल्याने लांबच्या पोलीस स्टेशन व चौक्या मध्ये जावे लागते परिणामी नागरिकांना व पोलीस यंत्रणांना तपासाच्या दृष्टीने गैरसोयीचे होते आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिवाजीनगर मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ मार्च २०१६ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांना ग्रामीण भागातील हद्द बदल बाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस अधिक्षक व शहरी भागातील ५६ पुनर्रचनेचे अधिकार पोलीस आयुक्तांना देण्याबाबत लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पोलीस अधिक्षक व पोलीस आयुक्तांना हद्दी बाबतचे आदेश देण्याच्या अधिकाराबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-१०-२०१८) : (१) राज्यातील ग्रामीण भागातील स्थलांतरामुळे नागरी क्षेत्रातील लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असली तरी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळण्यात समस्या निर्माण झालेल्या नाहीत.
(२), (३), (४) व (५) शिवाजीनगर मतदारसंघाचे विधान सभा सदस्य यांनी दिनांक १४ मार्च २०१६ रोजी ग्रामीण भागातील हद्दबदलबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक व शहरी भागातील ५६ पुनर्रचनेचे अधिकार पोलीस आयुक्तांना देण्याबाबत लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे.

नवीन पोलीस ठाणे अथवा विद्यमान पोलीस ठाणे यांच्या हद्दनिश्चिती करण्याबाबत गृह विभाग, शासन निर्णय दिनांक २५.०१.२००५ अन्वये मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आली आहेत. पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयाकडील हद्दनिश्चितीबाबतचे प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत शासनास सादर केले जातात. सदर प्रस्ताव व त्यासोबत सादर केलेली कागदपत्रे उपरोक्त मार्गदर्शक तत्वांच्या आधारे तपासण्यात येतात. सदर हद्दनिश्चितीबाबतच्या प्रस्तावास शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतची अधिसुचना राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येते. सदर बाब लक्षात घेता हद्दनिश्चितीबाबतचे अधिकार पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक यांना देण्याची आवश्यकता वाटत नाही.

राज्यातील पोलीस ठाणे व पोलीस चौक्याचा शहरी व ग्रामीण भागातील हद्दीमधील छोटे-मोठे फेरबदल करण्याचा प्रस्तावावर शासनाकडून तात्काळ कार्यवाही करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हा सह. दुध उत्पादक संघातील कर्मचाऱ्यांच्या निवेदनाबाबत

(९) ९१८२४ (०४-०९-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा सह. दुध उत्पादक संघातील कर्मचाऱ्यांना माहे मार्च, २०१६ पासून वेतन दिलेले नसून त्यामुळे त्यांची आर्थिक ओढाताण होत असल्याने संघटनेने दिनांक २० जून, २०१७ पासून असहकार आंदोलन सुरु केल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संघाने कामगार आयुक्त, नाशिक यांच्याकडे वारंवार लेखी वा तोंडी निवेदने देवूनही अद्यापपावेतो वेतन मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्हा सह. दुध उत्पादक संघातील कर्मचाऱ्यांच्या निवेदनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२४-१०-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्हा मजदूर संघ, संलग्न भारतीय मजदूर संघ, नाशिक या संघटनेच्या दिनांक ७.२.२०१७ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने कामगार उप आयुक्त, नाशिक कार्यालयात संघटना व व्यवस्थापन यांच्यात बैठका आयोजित करण्यात आल्या.

आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने कर्मचा-यांना वेतन देण्यास अडचणी होत असल्याचे व्यवस्थापनाने बैठकीच्या वेळी प्रतिपादन केले. कामगार उप आयुक्त, नाशिक कार्यालयाच्या पाठपुराव्यामुळे व्यवस्थापनाने माहे ऑगस्ट,२०१६ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आले आहे. उर्वरीत माहे सप्टेंबर,२०१६ ते माहे,डिसेंबर, २०१६ पर्यंतचे वेतनापैकी २,४८,५२९ इतकी रक्कम अदा केली असून रु.२,५२,३७४ इतकी रक्कम थकीत आहे. उर्वरीत थकीत वेतन मिळवून देण्याबाबत कामगार उप आयुक्त कार्यालय नाशिक कार्यालयामार्फत व्यवस्थापनाकडे पाठपुरावा चालू आहे.

(३) माहे जून, २०१६ ते जून, २०१७ या कालावधीतील थकीत वेतनाबाबत वेतन प्रदान अधिनियम,१९३६अंतर्गत निरीक्षण शेरा पारीत करण्यात आला आहे. तसेच, थकीत वेतन रुपये अदा करण्याबाबत व्यवस्थापनास सूचित करण्यात आले असून पुढील कार्यवाही चालू आहे.

नाशिक जिल्हा दुध उत्पादक संघामार्फत चालविण्यात येणा-या सिन्नर येथिल दुग्धशाळेला भेट देवून किमान वेतन अधिनियम,१९४८ अंतर्गत निरीक्षण शेरा पारीत करण्यात आला आहे. तसेच, वेतन विहीत मुदतीत न देणे व इतर तरतुदीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्याने व्यवस्थापनाविरुद्ध फौजदारी खटला दाखल करण्याची प्रक्रिया कामगार उप आयुक्त, नाशिक यांचे कार्यालयात चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यभरातील सेफ्टी ऑडीट संस्थाच्या कारभाराबाबत

(१०) ९५३७४ (०६-०१-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने सन २०१४ पासून सेफ्टी ऑडीटचा पर्याय कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आणुन राज्यभरात ७ ते ८ सेफ्टी ऑडीट संस्था औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे कामकाज करीत असल्याने वर्षातुन एकदा सेफ्टी ऑडीट रिपोर्ट तयार करावा असे निर्देश असतांना देखील उद्योजक धार्जिन्या संस्था ऑडीट रिपोर्ट तयार करण्याचा केवळ भास निर्माण करुन कामगारांची सुरक्षा धोक्यात घालत असल्याची बाब माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फॅक्टरी ॲक्टचे उल्लंघन करणा-या कंपन्यांवर कारवाई करण्याची मागणी कामगार संघटनांने दिनांक १९ जुलै २०१७ रोजी वा त्यासुमारास कामगार उपायुक्त, नाशिक व औद्योगिक सुरक्षा उपसंचालक, नाशिक यांचेकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा उद्योजक धार्जिन्या संस्थांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने दोषी आढळणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) :(१) हे खरे नाही.

दिनांक २४/०२/२०१४ च्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेप्रमाणे महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा) नियम, २०१४ मधील नियम ३(ब) अन्वये संबंधित कारखान्याने सुरक्षा लेखा परिक्षण दोन वर्षामधून एकदा, शासन मान्यताप्राप्त बाह्य सुरक्षा लेखा परिक्षकाकडून करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा) नियम,२०१४ मधील नियम २(१)(viii) च्या अन्वये दिनांक १८/०४/२०१४ ते दिनांक १९/०७/२०१६ पर्यंत दोन कंपन्यांना व एका सेफ्टी ऑडीटरला शासनाने मान्यता दिली होती.दिनांक २०/०७/२०१६ ते दिनांक १९/१२/२०१७ पर्यंत शासन मान्यता प्राप्त कोणीही सुरक्षा लेखा परिक्षक कार्यरत नव्हते. त्यामुळे उद्योजक धार्जिन्या संस्था ऑडीट रिपोर्ट तयार करण्याचा केवळ भास निर्माण करुन कामगारांची सुरक्षा धोक्यात घालत आहेत हे खरे नाही. याबाबत पूर्वी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयास सेफ्टी ऑडीटबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) होय, दिनांक १९/०७/२०१७ रोजी अपघातग्रस्त कामगार संघटनेकडून नाशिक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयास पत्र प्राप्त झाले होते. अपघातग्रस्त कामगार संघटनेकडून कार्यालयास प्राप्त झालेल्या १० कामगारांच्या अपघातांबाबत व अनुषांगिक बाबींविषयी संचालनालयाकडून चौकशी करुन सर्व १० कारखान्यांच्या भोगवटादार / व्यवस्थापकांवर फौजदारी खटले दाखल केले आहेत.

(३) व (४) दिनांक २०/०७/२०१६ ते दिनांक १९/१२/२०१७ पर्यंत शासन मान्यता प्राप्त कोणीही सुरक्षा लेखा परिक्षक कार्यरत नव्हते. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) विलंब झालेला नाही.

सोलापूर जिल्ह्यातील यंत्रमाग धारकांनी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी जमा केला नसल्याबाबत

(११) ९७३९४ (०६-०१-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यंत्रमाग कामगार कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत सोलापूर स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ नोव्हेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सोलापूर जिल्ह्यातील अनेक यंत्रमाग धारकांनी कामगारांचा भविष्य निर्वाह निधी संबंधित विभागास सपुर्द केला नसल्यामुळे भविष्य निर्वाह निधी विभागीय आयुक्त यांनी २० च्या वर यंत्रमाग कारखानदारांना नोटीस बजावले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगारांचा भविष्य निर्वाह निधीच्या निषेधार्थ सोलापूर शहरातील यंत्रमाग कारखानदार सर्व घटक एकच असून तिथे काम करणारे कामगार बेमुदत संपावर गेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कामगार विभागाने तसेच उद्योग विभागाने सदर प्रकरणाची दखल घेतली आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करून शासनाने यंत्रमाग कारखानदारांवर कारवाई करण्याबाबत व यंत्रमाग कामगार कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) : (१) होय.

(२) होय हे खरे आहे,

सुमारे ३०० यंत्रमाग धारकांना ईपीएफ कायद्या अंतर्गत ईपीएफ कार्यालयाच्या वतीने नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे नाही,

कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या निषेधार्थ सोलापूर शहरातील यंत्रमागधारक संघाने दिनांक १८/०८/२०१७ ते २२/०८/२०१७ व दिनांक ०७/१०/२०१७ ते २६/१०/२०१७ या कालावधीत यंत्रमाग उद्योग बंद ठेवले होते. तथापि, कामगार संपावर गेले नाहीत.

(४) होय, याबाबत यंत्रमाग उद्योग पुर्ववत सुरु करणेकामी सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर यांनी उभयपक्षाच्या संयुक्त बैठका दिनांक ०९/१०/२०१७,दि.११/१०/२०१७ व दि. १२/१०/२०१७ रोजी घेवून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला तथापि, तोडगा न निघाल्यामुळे यासंदर्भात मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे दिनांक १६/१०/२०१७ रोजी उभयपक्षाची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली. मा.जिल्हाधिकारी यांनी यंत्रमाग उद्योग पुर्ववत सुरु करण्याच्या सूचना दिल्या असता, त्यावेळी यंत्रमागधारक संघाच्या प्रतिनिधींनी यंत्रमाग उद्योग पुर्ववत सुरु करण्याबाबत सभासदांची चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे सांगितले होते. तद्नंतर देखील यंत्रमाग उद्योग सुरु न झाल्याने मा.राज्यमंत्री (कामगार) तथा पालक मंत्री सोलापूर यांनी दिनांक १७/१०/२०१७ रोजी यंत्रमागधारक संघाच्या प्रतिनिधींची बैठक घेवून यंत्रमाग उद्योग पूर्ववत सुरु करण्याबाबत सुचना दिल्या. तद्नंतर दि.२६/१०/२०१७ रोजी मा.राज्यमंत्री (कामगार) तथा पालक मंत्री सोलापूर यांनी उभयपक्षाची संयुक्त बैठक आयोजित केली. सदर बैठकीस विभागीय आयुक्त, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, पुणे यांचे प्रतिनिधी देखील हजर होते.

सदर बैठकीत राज्यमंत्री (कामगार) महोदय यांनी यशस्वी मध्यस्थी केल्याने व विभागीय आयुक्त, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना, पुणे यांनी भविष्य निर्वाह निधी योजना लागू करुन घेण्याकामी तीन महिन्याच्या कालावधीची अनुमती दिल्यानंतर यंत्रमागधारकांनी दिनांक ०७/१०/२०१७ रोजी बंद केलेले यंत्रमाग उद्योग दिनांक २७/१०/२०१७ पासून पूर्ववत सुरु करण्यात आलेले आहेत.

(५) यंत्रमाग कामगारांसाठी वेगळे कल्याणकारी मंडळ स्थापन न करता महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा नियम २०१३ अन्वये महाराष्ट्र असंघटित सुरक्षा मंडळ याची स्थापना करण्यात आलेली असून त्यामध्ये यंत्रमाग कामगारांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्याला २५० आधार यंत्रांची आवश्यकता असताना केवळ ९२ ठिकाणीच उपलब्ध असल्याबाबत

(१२) ९९०९८ (०६-०१-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्याला २५० आधार यंत्रांची आवश्यकता असताना केवळ ९२ ठिकाणीच ही यंत्रे उपलब्ध आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी पुणे यांनी १५ दिवसांमध्ये नवीन १५८ यंत्रे सर्व क्षेत्रीय कार्यालये आणि मंडल कार्यालयांमध्ये पुरवीले जाणार असल्याचे दिनांक २० सप्टेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास जाहिर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आधार यंत्रांसाठी नवीन ऑपरेटर यांची नोंदणी अद्याप करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१८) : (१) हे खरे नाही. पुणे जिल्ह्यात २१० आधार यंत्रे कार्यरत आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाचा सर्व कारभार ऑनलाईन झाला असून सातत्याने सर्व्हर डाऊन होत असल्यामुळे सामान्यांना त्याचा त्रास होत असल्याबाबत

(१३) १०१४५१ (०६-०१-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाचा सर्व कारभार ऑनलाईन झाला असून सातत्याने सर्व्हर डाऊन होत असतो तसेच माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंत शासनाच्या सर्व संकेतस्थळ अद्ययावत करण्यात आले नसल्यामुळे सर्व सामान्य नागरिकांना त्याचा त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१८) : (१) हे खरे नाही. शासनाच्या बहुतांश: सेवा डेटासेंटर मधुन चालविण्यात येतात व डेटा सेंटर मधील सर्व्हर डाऊन झालेले नव्हते.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

आधार कार्डवर चुकीच्या नोंदी होत असल्यामुळे विद्यार्थी शिष्यवुत्ती पासुन तर शेतकरी शासकीय योजनेपासून वंचित राहत असल्याबाबत

(१४) १०२०४८ (०६-०१-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे ब्रम्हपुरी (ता.मेहकर,जि.बुलढाणा) येथील एकाच कुटूंबातील सर्व सदस्यांच्या आधार कार्डवर एकच जन्म तारीख असल्याने मुलांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यास शाळेतील व आधार

कार्डवरील जन्म तारीख मिळत नसल्याने अर्ज भरता येत नाही तसेच कुटूंब शासकीय योजनेपासुन वंचित राहत असल्याचे माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुळ आधार कार्ड मध्ये झालेल्या चुकीची तात्काळ दुरूस्ती करण्यासाठी, बुलढाणा जिल्ह्यात नव्याने आधार कार्ड दुरूस्ती केंद्रे वाढविण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच आधार कार्डमुळे विद्यार्थी व शेतकरी लाभापासून वंचित राहील्यास शासन नुकसान भरपाई देणार काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) बुलढाणा जिल्ह्यात १०५ आधार संच कार्यरत आहेत. त्यामध्ये आधारकार्ड नवीन काढणे व आधारकार्ड दुरुस्तीची कामे करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील बांधकाम कामगारांना पंतप्रधान आवास योजना आणि कामगार कल्याण मंडळाकडून घरासाठी अनुदान मिळणार असल्याबाबत

(१५) १०४९९४ (१४-०४-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई यासारख्या राज्यातील शहरात इमारती बांधणाऱ्या बांधकाम कामगारांना पंतप्रधान आवास योजना आणि कामगार कल्याण मंडळाकडून घरासाठी साडे चार लाख रुपयाचे अनुदान मिळणार असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात किती नोंदणीकृत बांधकाम कामगार आहेत,

(३) असल्यास, सदरची योजना कशाप्रकारे राबवण्यात येणार आहे, तसेच, सदर योजनेचा लाभ बांधकाम कामगारांना देण्याकरीता शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) : (१)होय, हे खरे आहे.

(२) राज्यात जून २०१८ अखेर ११,३२,२९१ कामगारांची नोंदणी झालेली.

(३) मंडळातील नोंदणीकृत (सक्रिय) असलेल्या बांधकाम कामगारांना केंद्र शासनाकडून १.५० (लक्ष, राज्य शासनाकडून रू.१.०० लक्ष, मंडळाकडून रू.२.०० लक्ष असे एकुण रू. ४.५० लक्ष अनुदान देण्यात येणार आहे. सदर योजनेकरीता बांधकाम कामगारांच्या पात्रता निश्चिती संदर्भात दिनांक २९ ऑक्टोबर,२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खालापूर तालुक्यात (जि.रायगड) महिन्याभरात वेगवेगळ्या ४ ठिकाणी गुरांच्या कत्तलीच्या घटना घडल्याबाबत

(१६) १०५२६२ (०७-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर तालुक्यात (जि.रायगड) गत महिन्याभरात वेगवेगळ्या ४ ठिकाणी गुरांच्या कत्तलीच्या घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन अद्यापपर्यंत किती जणांना अटक करण्यात आली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी खालापूर पोलीस स्टेशन, गु.र.क्र. २७०/२०१७, गु.र.क्र. ०४/२०१८ व गु.र.क्र. ०६/२०१८ भा.द.वि. कलम ३७९, ४२९, ३४, सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (ब) ६,९,९, (अ) अन्वये गुन्हे दाखल करुन ९ जणांना अटक करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

आधार कार्डच्या सुरक्षिततेबाबत

(१७) १०५३१८ (१८-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आधार कार्डची संपूर्ण माहिती सुरक्षित आणि गोपनीय असल्याचे सांगितले जात असतानाच 'द ट्रिब्यून' या इंग्रजी वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार केवळ रुपये ५०० मध्ये आधार कार्डची माहिती मिळत असल्याची गंभीर बाब माहे, जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील आधार कार्डातील जमीनीच्या संदर्भातील माहितीचीही विक्री होत असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आधारमधील माहिती सुरक्षित रहावी यासाठी जमीनीच्या ७/१२ वर सिक्युरिटी कोड देण्याचा शासनाचा विचार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अशाप्रकारे नागरिकांची गोपनीय माहिती हॅकर्सकडून लीक केली जात असल्यास आधार कार्डच्या सुरक्षीततेसंदर्भात राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) हे खरे नाही.अशी बाब Unique Identification Authority of India (UIDIA), भारत सरकार यांच्याकडून निर्देशनास आणण्यात आलेली नाही.

(२) व (३) हे खरे नाही. आधारकार्डामध्ये केवळ फोटो, नाव, पत्ता, वय/जन्म तारीख व लिंग या बाबींचा समावेश असतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्ह्यातील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत

(१८) १०५५४८ (१४-०४-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील निवृत्त कर्मचा-यांना केंद्राप्रमाणे सातवा वेतन लागू करावा, जुनी पेन्शन योजना सुरु करावी, दोन वर्षापासून प्रलंबित असलेली पेन्शनची प्रकरणे निकाली काढावी, अशा विविध मागण्यांसाठी सदर कर्मचा-यांनी भिक्षा मांगो आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) :(१) निवृत्त कर्मचारी संघटना व इतर संघटना यांचेकडून पेन्शन संदर्भातील मागण्यांबाबतचे दिनांक १६.११.२०१७ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडे प्राप्त झाले आहे.

(२) धोरणात्मक बाब असल्याने, सदर निवेदन पुढील कार्यवाहीसाठी मा.सचिव, श्रम व रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे दिनांक १७.११.२०१७ च्या पत्रान्वये सादर करण्यात आले आहे.

कामगार आयुक्त कार्यालयाकडून सदर निवेदनाची प्रत भविष्य निर्वाह निधी संगठन, मुंबई या कार्यालयाकडे पाठविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही,

असंघटीत कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्याची घोषणा प्रलंबित असल्याबाबत

(१९) १०६६१२ (१४-०४-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व असंघटीत घटकांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी एकच असंघटीत कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्याची घोषणा मा.वित्तमंत्री यांनी सन २०१७-१८ च्या आर्थिक वर्षात केली असून सदर महामंडळ स्थापन करण्याची प्रशासकीय प्रक्रिया पुर्ण होवून सुद्धा घोषणा गेली ८ महिने प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील असंघटीत क्षेत्रातील कामगार कल्याण मंडळात यंत्रमाग कामगार, शेतमजूर, पत्रकार व वृत्तपत्र विक्रेते, रिक्षाचालक, ट्रकचालक, वाहनचालक यांनाही समाविष्ट करण्याची मागणी प्रस्तुत लोकप्रतिनिधी विधानसभा सदस्य, इचलकरंजी यांनी माहे मे २०१६ मध्ये तसेच वेळोवेळी मा. कामगार मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रस्तावाची सध्यस्थिती काय आहे व सदर महामंडळ केव्हापर्यंत कार्यन्वीत होणे अपेक्षीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१८) : (१) हे खरे नाही,

(२) हे खरे आहे,

(३) असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ च्या कलम ६ अन्वये राज्यात महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ दि. ३/४/२०१८ रोजीच्या शासन अधिसुचनेद्वारे गठित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही,

मुंबई म.न.पा.च्या अंधेरी के पूर्व विभागात सहाय्यक अभियंत्यांच्या बेहिशोबी मालमत्तेची चौकशी करण्याबाबत

(२०) १०६७८२ (१२-०४-२०१८). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालीकेच्या अंधेरी के पूर्व विभागात सहाय्यक अभियंता म्हणून काम करणाऱ्या श्री.अनिल मेस्त्री या व्यक्तीविरुध्द श्रीमती आकृती मेस्त्री या त्याच्याच पत्नीने मुख्यमंत्री, पंतप्रधान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) दिलेल्या तक्रारीनंतर एसीबीने केलेल्या चौकशीत या सहाय्यक अभियंत्याने ज्ञात स्त्रोत उत्पन्नापेक्षा १३०० पट जादा संपत्ती कमविल्याची बाब उघडकीस आल्याने, एसीबीने श्री.अनिल मेस्त्री, त्याची दिवंगत आई व पत्नीविरुध्द गुन्हा नोंदविल्याची बाब उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसीबीने केलेल्या तपासात उघडकीस आलेल्या व निष्पन्न झालेल्या प्रमुख बाबी कोणत्या,

(३) असल्यास, आकृती मेस्त्री यांनी मा.मुख्यमंत्री व अन्य व्यक्तींकडे केलेल्या तक्रारीत नमूद केलेल्या सर्व प्रकरणांची चौकशी व तपास पूर्ण करण्यात आला आहे काय, तसेच बँक लॉकर, शेअर्स, जमिनीची खरेदी इ.बाबत तपास करुन बँक लॉकर सिल करण्यात आले आहेत काय,

(४) तसेच या प्रकरणी सहाय्यक अभियंता अनिल मेस्त्री यांनी बेहिशोबी मालमत्ता जमा करताना त्याला सहकार्य करणाऱ्या महानगरपालीकेतील किती व्यक्तींची नावे वा विकासकांची नावे उघड झाली आहेत, त्यांचेविरुध्द बेकायदेशीर व्यवहारास सहकार्य करणे, लाच देणे इ.विविध आरोपांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय व बेकायदेशीर संपत्ती जमा केल्याचे उघड होऊनही अनिल मेस्त्री यांना तातडीने अटक न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, अनिल मेस्त्री यांना तातडीने अटक न करता व त्यांच्या संपत्तीपैकी काही भाग शासनाकडे नोंदवून उर्वरीत कोट्यवधी रुपयांची संपत्तीची नोंद न घेता त्यांना सदर संपत्तीची विल्हेवाट लावण्याकरीता पुरेसा वेळ देणाऱ्या एसीबीच्या संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द कारवाईत हेतूत: दिरंगाई व निष्काळजीपणा दाखविल्याबद्दल कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१८) : (१) अर्जदार श्री. दिलीप केसरसिंग राजपुत यांनी दिलेल्या तक्रार अर्जावरून केलेल्या चौकशीमध्ये आरोपी लोकसेवक श्री. अनिल मिस्त्री यांनी त्यांच्या सेवा कालावधीत त्यांच्या ज्ञात उत्पन्नापेक्षा विसंगत अशी रू. ७,७२,४८,३८१/- (१३०७.१८ टक्के) इतकी अपसंपदा संपादित केल्याची तसेच त्यांची पत्नी नामे श्रीमती आकृती मिस्त्री आणि आई नामे श्रीमती इंद्रमती मिस्त्री (मयत) यांनी आलोसे श्री. मिस्त्री यांनी संपादित केलेली मालमत्ता ही अपसंपदा आहे हे माहित असुनही सदरची मालमत्ता स्वत:च्या नावे धारण करून आलोसे श्री. मिस्त्री यांना प्रोत्साहन दिल्याने त्यांच्याविरूध्द गु.र.क्र. ४४/२०१७, कलम १३(१)(इ)सह १३(२) भ्र.प्र.अधि. १९८८ सह १०९ भा.दं.वि. अन्वये दि. १४.१२.२०१७ रोजी लाप्रवि, मुंबई येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) आरोपी लोकसेवक श्री.अनिल मिस्त्री यांचेविरूध्द दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने आजपावेतो केलेल्या तपासामध्ये खालीलबाबी निष्पन्न झालेल्या आहेत.

१. आलोसे श्री. अनिल मिस्त्री व त्यांची आई इंदुमती मिस्त्री यांचे नावे मे. कुमार बिल्डर्स यांचेकडून सर्व्हे नं. ७८/७९ मांजरे बुद्रुक येथे ४०८.४९ चौ.मी.चा प्लॉट खरेदी करून त्यांची नोंदणी दस्त क्र. १२२६/१/४८/२००५ अन्वये सह दुय्यम निबंधक (वर्ग-२) हवेली यांच्याकडे केलेली आहे.

२. मौजे खोडाळा, ता. मोखाडा, जिल्हा ठाणे (सध्या पालघर) येथे दि. ०५.०६.२००८ रोजी शेतजमीन खरेदी केल्याबाबतची नोंद दस्त क्र. १७५८/२००८ अन्वये दुय्यम निबंधक, मुरबाड यांच्याकडे केलेली आहे.

३. सेव्हिला बिल्डिंग येथील फ्लॅट क्र. ५०१/५०२ हा इंदुमती चंद्रवदन मिस्त्री यांनी ०१.०६.२०१५ रोजी खरेदी केला असल्याबाबत दस्त क्र. २९०९/१/४९/२०१५ व २९१०/१/४९/२०१५ अन्वये सह दुय्यम निबंधक बोरीवली-३ यांचेकडे नोंद केली आहे.

४. आरोपी लोकसेवक श्री. अनिल मिस्त्री व त्यांची आई यांचे संयुक्त नावे असलेला फ्लॅट नं. ७०२ बी विंग, बंचबेरी सोसायटी, यारी रोड, अंधेरी पश्चिम हा फ्लॅट आलोसे अनिल मिस्त्री यांनी त्यांची आई इंदुमती मिस्त्री यांना दिनांक २२.०८.२०१४ रोजी बक्षिस पत्राद्वारे बक्षिस दिला असल्याची नोंद दस्त क्र. ६९२४/५/३५/२०१४ अन्वये सह दुय्यम निबंधक, अंधेरी क्र. ६ येथे घेण्यात आलेली आहे.

५. आलोसे श्री. अनिल मिस्त्री यांनी एल.आय.सी. शाखा क्र. ९०७ फोर्ट, मुंबई येथुन स्वत:चे नावे ३ पॉलीशी घेतल्या असल्याचे तसेच एल.आय.सी. शाखा क्र. ९२२ येथुन स्वत:चे नावे ३ व पत्नी आकृती व मुलगा वेदांत यांचे नावे ५ विविध पॉलीसी घेतलेल्या आहेत.

उपरोक्त नमुद मालमत्तेच्या व्यतिरिक्त आलोसे श्री. मिस्त्री यांच्या उघड चौकशी दरम्यान निष्पन्न झालेल्या आणि त्यांचे, त्यांची पत्नी श्रीमती आकृती मिस्त्री आणि आई श्रीमती इंदुमती मिस्त्री (मयत) यांचे नांवावर असलेल्या एकुण २० स्थावर मालमत्ता आणि बँक खाते यामध्ये असलेल्या रक्कमेच्या अनुषंगाने तपास चालु असुन, मालमत्ते संदर्भातील माहिती प्राप्त करण्याकरीता संबंधितांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सदर माहिती प्राप्त करण्याकरीता पाठपुरावा सुरू आहे.

(३) अर्जदार श्री. दिलीप रजपुत यांनी केलेल्या तक्रार अर्जास अनुसरून सखोल चौकशी करून १. श्री. अनिल मिस्त्री, २. श्रीमती आकृती मिस्त्री ३. श्रीमती इंदुमती मिस्त्री (मयत) यांचे विरूध्द गुन्हा नोंद क्र. ४४/२०१७, कलम १३(१)(ई), १३(२) भ्र.प्र.अधि.१९८८ सह १०९ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन, गुन्हयाचा तपास चालु आहे.

आलोसे तसेच त्यांची आई व पत्नी यांचे बँक लॉकर्स, बँक खाती हाताळण्यास परवानगी देवू नये व जमिनीचे खरेदी विक्री संदर्भात या कार्यालयास पुर्व सुचना दिल्याशिवाय व्यवहार करण्यात येवू नये असे संबंधितांना कळविण्यात आलेले आहे.

(४) आलोसे श्री. अनिल मिस्त्री यांच्याविरूध्द दाखल गुन्ह्याच्या तपासामध्ये त्यांना सहकार्य करणारे म.न.पा. तील व्यक्ती वा विकासक यांची नावे अद्यापपावेतो निष्पन्न झालेली नाहीत.

आलोसे श्री. अनिल मिस्त्री यांच्याविरूध्द दाखल गुन्ह्याच्या तपास चालु आहे.ते गुन्हयाच्या तपासात सहकार्य करीत आहेत. तसेच त्यांच्याविरूध्द दाखल गुन्ह्यात निष्पन्न झालेल्या अपसंपदेच्या अनुषंगाने त्यांची उत्पन्न, मालमत्ता, खर्च याबाबतची माहिती आलोसे तसेच संबंधित विभाग यांच्याकडून प्राप्त करण्याची कार्यवाही सुरू असुन अद्याप आलोसे यांना अटक करण्यात आलेली नाही.

(५) आलोसे श्री. अनिल मिस्त्री यांच्याविरूध्द तक्रार अर्ज प्राप्त झाल्यनंतर दिनांक ०१.०३.२०१७ रोजी गुप्त चौकशी सुरू करण्यात आली. त्यानंतर त्यांचे सक्षम प्राधिकारी यांच्या परवानगीने दिनांक १९.०६.२०१७ रोजी उघड चौकशी सुरू करण्यात आली असुन दिनांक १४.१२.२०१७ रोजी त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. यामध्ये कोणतीही दिरंगाई झालेली नाही.

सदर गुन्हा दाखल झाल्यापासुन अद्यापपावेतो आलोसे मिस्त्री यांनी त्यांच्या संपत्तीची परस्पर विल्हेवाट लावलेली नाही. तसेच आलोसे, त्यांची पत्नी आणि आई यांचे बँक लॉकर्स, बँक खाती हाताळण्यास परवानगी देवु नये त्याचबरोबर जमीनीचे खरेदी विक्री संदर्भात या कार्यालयात पूर्व सूचना दिल्याशिवाय व्यवहार करण्यात येवु नये याकरीता संबंधितांना तात्काळ कळविण्यात आलेले आहे.

त्यामुळे आलोसे यांना तातडीने अटक न करता त्यांना त्यांच्या संपत्तीची विल्हेवाट लावण्याकरीता पुरेसा वेळ दिला हे म्हणणे खरे नाही. तसेच सदर गुन्ह्याचे तपासी अधिकारी यांनी सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये कोणतीही दिरंगाई अथवा निष्काळजीपणा दाखविलेला नाही.

(६) आलोसे तसेच संबंधित विभाग यांचेकडून आलोसे यांचे उत्पन्न, खर्च आणि मालमत्ता याबाबतची माहिती प्राप्त करण्याची कार्यवाही सुरू आहे. गुन्ह्याच्या तपासाअंती निष्पन्न झालेली मालमत्ता गोठविण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला नाही.

मुंबईतील मेघवाडी (जोगेश्वरी) येथील व शिवाजी पार्क पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरिक्षकांना लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याबाबत

(२१) १०७८०४ (११-०४-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मेघवाडी (जोगेश्वरी) येथील पोलीस ठाण्यातील संदिप बढे व दादर (मुंबई) येथील शिवाजी पार्क पोलीस ठाण्यातील श्री.सागर उत्तम शिंदे या दोघा पोलीस उपनिरीक्षकांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिका-यांनी दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास रुपये दहा हजारांची लाच घेतांना अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधिताविरुध्द पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१८) : (१) होय हे खरे आहे, पोलीस उप निरीक्षक संदिप बढे, मेघवाडी पोलीस स्टेशन व सागर उत्तम शिंदे, पोलीस उप निरीक्षक, शिवाजी पार्क पोलीस, दादर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक ०७.०१.२०१८ रोजी व दिनांक २२.१२.२०१७ रोजी सापळा कारवाई मध्ये लाच स्विकारताना अटक केली आहे.
(२), (३) व (४) सदर दोन्ही प्रकरणी आरोपी विरुध्द तपास पुर्ण झाला असून अभियोग दाखल करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची योग्य ती कार्यवाही सुरू आहे.

निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्तीवेतनात वाढ करण्याबाबत

(२२) १०९७१३ (१४-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यासह देशातील निवृत्तीवेतन धारकांना त्यांना मिळत असलेल्या निवृत्तीवेतनामध्ये वाढ करून मासिक निवृत्तीवेतन कमीत कमी रुपये ८ हजार ५०० करण्यात यावे, असे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व राज्याच्या भविष्य निर्वाह निधी आयुक्तांना केंद्रीय भविष्य निर्वाह निधी आयुक्तांनी आपापल्या राज्यातील निवृत्तीवेतन धारकांना त्यांच्या निवृत्ती वेतनात वाढ करण्याच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील निवृत्तीवेतन धारकांना त्यांच्या निवृत्तीवेतनामध्ये वाढ करण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) : (१) हे खरे नाही,
(२) प्रश्न उद्भवत नाही,
(३) प्रश्न उद्भवत नाही,
(४) प्रश्न उद्भवत नाही,

खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) वावर्ले व तांबाटी येथे जनावरांची हत्या करून मांस घेऊन आरोपींनी केलेले पलायन

(२३) १०९९५३ (१२-०४-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) वावर्ले व तांबाटी येथे जनावरांची हत्या करून त्यांचे मांस नेल्याची घटना नुकताच घडली असतांना पुन्हा वावर्ले ग्रामपंचायत हद्दीतील भिलवले ठाकूर वाडीत तीन बैलांची हत्या करून मांस घेऊन आरोपी पसार झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेमुळे परिसरातील शेतक-यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०१८) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी खालपूर पोलीस ठाणे गु.र.क्र. ०६/२०१८ भा.द.वि. कलम ३७९,४२९,३४ सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (ब) ६,९,९ (अ), अन्वये गुन्हा नोंद करण्यात येऊन १० आरोपींना अटक करण्यात आले आहे व पुढील तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात पतंजलीची उत्पादने शासकीय सेवा केंद्रावर विक्री करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत

(२४) ११००४९ (२०-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पतंजलीची उत्पादने शासकीय सेवा केंद्रावर विक्री करण्याचा निर्णय शासनाने रद्द करण्याची मागणी सर्वत्र होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पतंजली उत्पादनांची आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात असूनही शासकीय सेवा केंद्रातून सदर उत्पादने विकण्याची परवानगी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे राज्यातील महिला बचत गटांच्या विक्रीवर परिणाम होणार असून उक्त प्रकरणी पतंजलीची उत्पादने सरकारी सेवा केंद्रावर विक्री करण्याचा निर्णय रद्द

करण्यासंदर्भात तसेच राज्यातील महिला बचत गटांना उभारी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१८) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) कोणतीही खाजगी कंपनी CSC-SPV सोबत करार करून आपली उत्पादने CSC डिजीटल सेवा पोर्टलवर आपले सरकार सेवा केंद्रामार्फत विक्री करू शकतात. CSC मार्फत उत्पादन विक्री करण्यासाठी पतंजलीसह इतर खाजगी कंपन्यांनी देखील करार केले आहेत. उदा. ITC, SAMSUNG, CROMPTON, HP,I BALL, GODREJ, RALLIES, IFFICO इत्यादी.
राज्यातील महिला बचत गट CSC-SPV सोबत करार करुन आपले सरकार सेवा केंद्रामार्फत विक्री करू शकतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहरासह जिल्ह्यातील बालकांमगारांचे उच्चाटन करण्यासाठी टास्क फोर्स कमिटी गठीत करण्याबाबत

(२५) ११०७२१ (१४-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरासह जिल्ह्यात कौटुंबिक परिस्थिती हलाखीची असल्याने अनेक बालकामगारांवर कचरा वेचणे, वीटभट्टी, दुकाने, हॉटेलात काम करण्याची वेळ आली असून त्यांचे आरोग्यही धोक्यात सापडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे बालकामगार प्रथेला प्रतिबंध करण्यासाठी असलेली शासनाची टास्क फोर्स कमिटी तीन वर्षापासून अस्तित्वात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने येथे बालकामगारांचे सर्वेक्षण करुन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासोबतच सदर समितीचे गठन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) : (१) हे खरे नाही,
(२) शासन निर्णय क्र. सीएलए-२००९/(४)/काम-४, दिनांक ०२.०३.२००९ अन्वये मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कृतीदल स्थापन करण्यात आले आहे.
(३) मागील तीन वर्षापासून कृतीदलामार्फत ११ धाडी आयोजित करण्यात येवून २ बांधकाम क्षेत्रातून, ३ हॉटेल व्यवसायातून व १ दुकाने या अनुसूचित उद्योगातून अश्या एकूण ६ बालकामगारांची मुक्तता करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वरोरा (जि.चंद्रपूर) येथील जी.एम.आर.पॉवर प्लॉन्ट मधील कर्मचाऱ्यांची पिळवणूक होत असल्याबाबत

(२६) ११०८७८ (१४-०४-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) येथील जी.एम.आर.पॉवर प्लॉन्ट मध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांकडून ८ तासा ऐवजी १२ तास कुठलाही अतिकालीन भत्ता (ओव्हरटाईम) न देता काम करून घेतल्या जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक कामगार व परप्रांतिय कामगार यामध्ये भेदभाव करून कर्मचाऱ्यांवर दबाव टाकून अतिरिक्त काम त्यांच्याकडून करून घेतल्या जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांच्या पगारातून भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपात केल्या जात असतांना सुध्दा भविष्य निर्वाह निधी कार्यालयात भरणा केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची कामगार कायद्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे,

(५) असल्यास, तद्नुसार या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) : (१), (२), (३) व (४) या प्रकरणी कारखान्यास चौकशी केली असता व्यवस्थापनाने कामगारांकडून नियमबाह्य अतिकालीन काम करवून घेणेबाबत आढळले असून कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द कारखाने अधिनियम १९४८ अंतर्गत कलम ६५(३)(iv) चा भंग दर्शविण्यात आलेला असून कारणे दाखवा नोटीस काढल्यानंतर, व्यवस्थापनाने यापुढे नियमबाह्य अतिकालीन काम न करण्याची हमी दिली आहे.

तसेच कर्मचा-यांच्या पगारातून भविष्य निर्वाह निधीची रक्कमही व्यवस्थापनाने भविष्य निर्वाह निधी कार्यालयात जमा केली आहे.

(५) वरीलप्रमाणे

(६) विलंब झालेला नाही.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर अवजड वाहनांच्या अवैध पार्किंग मुळे होणा-या अपघातांबाबत

(२७) ११२४५२ (०१-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील घोडबंदर ते तलासरीच्या अच्छाड पर्यंतच्या ११० कि.मी. च्या पट्टयावर मोकाट फिरणारी गुरे, हायवेच्या कडेला अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणावर अवैध पार्किंग यामुळे दिवेंसदिवस अपघाताचे प्रमाण वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-अहमदाबाद महामार्गावर असंख्य वाहन चालकांकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असून हायवे, सर्व्हीसरोड तसेच विरोधी दिशेने येणा-या वाहनचालकांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी वा पहाणी केली आहे काय.

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने महामार्गावर होत असलेली अवैध वाहनांची पार्किंग व वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-या वाहन चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१८) : (१) ठाणे ग्रामीण पोलीसांच्या कार्यक्षेत्रामधील दहिसर चेक नाका ते घोडबंदर या महामार्गावर कोणत्याही प्रकारे अवजड वाहनांची अवैध पार्किंग होत नाही. तर पालघर जिल्हयातून जाणाऱ्या मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर अवैध पार्किंगमुळे एकाही अपघाताची नोंद नाही. परंतु मोकाट फिरणाऱ्या गुरांमुळे अपघात झाल्याबाबतचा गुन्हा दाखल असून एका आरोपीस अटक करुन कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

(२) मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर विरोधी दिशेने येणाऱ्या वाहनांमुळे सन २०१६ ते अद्यापपर्यंत १३ गुन्हे दाखल असून त्यात एकूण ११ आरोपीतांना अटक करुन त्यांचे कारवाई करण्यांत आली आहे.

(३) उपरोक्त (१) व (२) प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) महामार्गावर होत असलेल्या अवैध पार्किंग व वाहतूक नियमांचे उल्लंघन कराणाऱ्या वाहनचालकांवर महामार्ग पोलीसांनी केलेल्या कारवाईची माहिती पुढीलप्रमाणे :-

सन	एकूण केसेस	एकूण दंड (रु.)
२०१५	७६८	७६,८००
२०१६	२४८०	१,४२,१००
२०१७	२००५	४,०१,०००
२०१८ अद्यापपर्यंत	३०९	६१,८००

विरुध्द दिशेने येणाऱ्या वाहनांवर महामार्ग पोलीसांनी केलेल्या कारवाईची माहिती पुढीलप्रमाणे :-

सन	एकूण केसेस	एकूण दंड (रु.)
२०१५	१,१४२	१,८५,१००
२०१६	५,३५१	८,४९,९००
२०१७	१,१२७	२,२५,४००
२०१८ अद्यापपर्यंत	४५४	१,०९,०००

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयावर भारतीय ट्रेड युनियन केंद्राच्या (सीटू) वतीने कामगारांच्या विविध मागण्यासाठी केलेले आंदोलन

(२८) ११२५४९ (११-०४-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय ट्रेड युनियन केंद्राच्या (सीटू) वतीने कामगारांच्या विविध मागण्यासाठी दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून ठिय्या आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागण्याचे निवेदन निवासी जिल्हाधिका-यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनात कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत व या मागण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१८) : (१) होय.

(२) होय.

(३) सदर निवेदनात खालील मागण्या आहेत.

१) सर्व वाय.आय.टी., वाय.सी.एफ व निम, टेम्परारी, कंत्राटी या व अशा पध्दतीच्या शिका व कमवा या योजनेत काम करणा-या तरुण-तरुणीना किमान वेतन, रजा, बोनस, प्रॉ.फंड, ग्रॅच्युटी, ई.एस.आय इत्यादि लाभ लागु करणे.

२) कंत्राटी पध्दत बंद करा व त्या कामगारांना त्याच आस्थापनेत कायम करा.

३) समान कामाला समान वेतन द्या.

४) वाय.आय.टी., सी.एफ व निम,टे म्पररी कंत्राटीच्या नावाखाली काम करणा-या कामगारांना त्याच उद्योगात कायम करा.

वायआयटी मार्फत प्रशिक्षणार्थींकरिता योजना राबविण्यात येत असून, त्यातील प्रशिक्षणार्थींना ॲप्रेंटिस कायदा,१९६१ मधील तरतूदी लागू आहेत. तसेच नीम प्रशिक्षणार्थींना अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद अधिनियम, १९८७ (AICTE Act,१९८७) लागू होतो. कंत्राटी कामगारांसंदर्भात कंत्राटी कायदा नियमन व निर्मुलन अधिनयम, १९७० अन्वये कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तळवाडे (ता.सायखेडा, जि.नाशिक) गावात अवैध दारु विक्री सुरु असल्याबाबत

(२९) ११३२३२ (१२-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळवाडे (ता.सायखेडा, जि.नाशिक) गावात अवैध दारु विक्री सुरु असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गावातील महिलांनी दारुबंदीसाठी शासनाकडे मागणी करुनही शासनाने या अवैध दारु विक्रेत्यांवर कोणतीच कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी तळवाडे गावातील अवैध दारु विक्रेत्यांवर कारवाई करुन या गावात दारुबंदी करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१८) : (१) व (२)

तळवाडे गावात अवैध दारु विक्री सुरु असल्याबाबत माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पोलीस स्टेशन सायखेडा येथे लेखी अथवा तोंडी तक्रार प्राप्त नसून अवैध दारु धंदयाबाबत सायखेडा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल नाही. गावातील महिलांची दारु बंदीबाबत शासनाकडे कुठलीही तक्रार अथवा अर्ज प्राप्त नाही. तथापि राज्य उत्पादन शुल्क येवला कार्यालयाने दि.२०.०२.१८, दि.१३.०३.१८ व दि.१७.०४.१८, रोजी गुन्हे नोंदविलेले असून ३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर आरोपींवर मुंबई दारूबंदी कायदा १९४९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला असून मा.न्यायालयात प्रकरण दाखल करण्यात आलेले आहे.

(३) तळवाडे गावातील अवैध दारु विक्री रोखण्यासाठी वेळोवेळी गुप्त बातमीदारांमार्फत बातम्या काढून कार्यवाही करण्यात येते तसेच पोलीसामार्फत पेट्रोलिंग करण्यात येते. सदर गावात ग्रामरक्षक दल स्थापन करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

सोलापूर जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रात स्वतंत्र पोलीस स्टेशन सुरु करण्याचा प्रस्ताव सन २०१३ पासून अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याबाबत

(३०) ११४३९१ (११-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रात स्वतंत्र पोलीस स्टेशन सुरु करण्याचा प्रस्ताव सन २०१३ पासून अद्यापपर्यंत प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव मंजूर करुन सोलापूर एमआयडीसीमध्ये स्वंतत्र पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१८) : (१) व (२) पोलीस अधीक्षक, सोलापूर(ग्रामीण) अंतर्गत असलेले पोलीस स्टेशन मोहोळ व पोलीस स्टेशन सोलापूर तालुक्याचे विभाजन करून नवीन एमआयडीसी चिंचोली पोलीस स्टेशन निर्माण करणेबाबतचा पोलीस महासंचालक कार्यालयाकडील दि.३१.०५.२०१८ रोजीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

नवीन पोलीस स्टेशन निर्मितीसाठी गुन्हयांची सरासरी विचारात घेता चिंचोली पोलीस स्टेशन निर्माण करण्याची आवश्यकता आहे काय? आणि आवश्यकता असल्यास त्या जिल्हयातील उपलब्ध मनुष्यबळातून पोलीस स्टेशन निर्माण करणे शक्य असल्यास प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

दौंड तालुक्यातील (जि.पुणे) अनेक कंपन्यांमध्ये कामगार कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत

(३१) ११४६३१ (१४-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड तालुक्यातील (जि. पुणे) मोठ्या प्रमाणावर असलेल्या उद्योगधंद्यामध्ये परप्रांतीय कामगार काम करीत असून कामगार कायद्याचे उल्लंघन होत असल्याने नागरिकांनी याबाबत अनेक वेळा तक्रारी केल्या असून कंपनीमध्ये घडलेल्या अपघातामध्ये अनेक कामगारांना जीव देखील गमवावा लागला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भांडगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथील मीनाक्षी स्टील या लोखंड बनवणाऱ्या कंपनीमध्ये दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास स्फोट होऊन यामध्ये ३ परप्रांतीय कामगारांचा मृत्यू झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषींवर तसेच कामगार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या अन्य कंपन्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) : (१) दौंड तालुक्यातील (जि.पुणे) मोठ्या प्रमाणावर असलेल्या उद्योगधंद्यामध्ये काही प्रमाणात परप्रांतीय कामगार काम करीत आहेत. तथापि दौंड तालुक्यातील कारखाने अधिनियमांतर्गत नोंदणीकृत असलेल्या कारखान्यांच्या संदर्भात औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडे नागरिकांकडून एकही तक्रार प्राप्त झालेली नाही.

तरी दौंड तालुक्यातील मे.मिनाक्षी फेरो इंगोट्स प्रा.लि., मे.महावीर स्टील इंडस्ट्रीज लि., मे.भुलेश्वर स्टील ॲन्ड अलॉय प्रा.लि., मे.सी.डी.मेटल प्रा.लि. या कारखान्याबाबत दिनांक ११/०१/२०१८ रोजी कामगार उप आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयात तक्रारी प्राप्त झाल्याचे कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे. तक्रारीच्या अनुषंगाने मे.जी.डी.मेटल प्रा.लि. व मे.मिनाक्षी फेरो इंगोट्स प्रा.लि.यांच्या विरोधात कामगार उप आयुक्त, पुणे यांच्याकडून विविध कामगार कायद्यानुसार मा.न्यायालयात खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पुणे यांच्याकडे सदर कारखान्यामुळे हवा प्रदुषण होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, पुणे यांच्याकडून कार्यालयास कळविण्यात आले आहे. तक्रारीच्या अनुषंगाने मंडळाने कारखान्याविरोधात कारणे दाखवा नोटीस बजावली होती.

वर्ष २०१६-१७ मध्ये दौंड तालुक्यातील कारखाने अधिनियम अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या ५ कारखान्यांमध्ये सहा कामगांराना प्राणघातक अपघाताच्या घटना झालेल्या आहेत, हे खरे आहे.
(२) मिनाक्षी फेरो इंगॉटस प्रा.लि.३५०, ३६१, खोर रोड, यावत, भांडगांव, ता.दौंड, जि.पुणे या लोखंड वितळून बार, अँगल इत्यादीचे उत्पादन करणा-या काखान्यामध्ये दिनांक ३१/०१/२०१८ रोजी वितळलेला धातुचा रस क्रेनच्या सहाय्याने लॅडलमध्ये वाहून नेत असताना त्यातील धातुचा उष्ण रस बाहेर उडाला व त्यामुळे ७ कामगारांना भाजण्याच्या जखमा झाल्या. त्यापैकी ३ कामगारांचा हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच धातुचा उष्ण रस जवळ ठेवलेल्या ऑक्सिजन सिलेंडरवर पडल्यामुळे त्याचा स्फोट झाला, हे खरे आहे.
(३) या प्रकरणाची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या पुणे विभागाने चौकशी केली आहे. चौकशीतुन असे आढळून आले की, धातुचा रस लॅडलमध्ये वाहुन नेण्यासाठी वापरण्यात येणा-या क्रेनच्या हॉईस्टची यंत्रणा (माल वर/खाली करण्यासाठी यंत्रणा) नादुरुस्त झाल्यामुळे लॅडल खाली येऊन आपटली व त्यामुळे धातुचा रस तेथे काम करणा-या ७ कामगारांच्या अंगावर उडून त्याचा अपघात झाला होता.

क्रेनची देखभाल, तपासणी न करणे, कामगारांना सुरक्षा साधने न पुरविता काम करावे लागणे व त्यामुळै कामाची पध्दत सुरक्षित नसणे, धातुचा रस वाहून नेण्याची व्यवस्था

सुरक्षित नसणे इत्यादी संदर्भात आढळून आलेल्या कारखाने अधिनियम १९४८ चे कलम २९(१)(a)(ii), कलम २९(१)(b),कलम ७A(२)(a), कलम७A(२)(b) च्या भंगाबाबत भोगवटादाराविरुध्द खटला क्र.२०८६१/२०१८ व कारखाने अधिनियम १९४८ चे कलम ६२(१), कलम ६१(१) च्या भंगाबाबत व्यवस्थापकाविरुध्द खटला क्र.२०८६२/२०१८ मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, पुणे यांचे न्यायालयात दिनांक२२/०२/२०१८ रोजी दाखल करण्यात आलेले आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

पुणे जिल्हात घरेलू कामगारांनी विविध मागण्यासाठी निदर्शने केल्याबाबत

(३२) ११६५०२ (१८-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा घरकामगार संघटना, पुणे शहर मोलकरीण संघटना, सर्व श्रमिक संघ,महाराष्ट्र घरकामगार उगम संघटना,महाराष्ट्र घरेलू कामगार संघटना, मोलकरीण पंचायत,हिंद मजदूर सभा यांच्या संयुक्त घरेलू कामगार कृती समितीच्या वतीने सहकामगार आयुक्तालयापुढे विविध मागण्यांसाठी निदर्शने करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरेलू कल्याणकारी मंडळात महिलांची नोंदणीसाठी वयोमर्यादा ७० वर्ष करावी,किमान वेतन आणि महागाई भत्ता द्यावा,कामांचे तास,पगारी रजा,विमा आणि भविष्य निर्वाह निधी आणि निवृत्ती वेतनासाठी सर्वंकष कायदा करावा अशा विविध मागण्यासाठी निदर्शने झाली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळावर कामगार संघटनेचे प्रतिनिधी नेमावे,राज्य सरकारकडून १०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करावी, मातृत्व लाभाची रक्कम रुपये ६ हजार करावी, निवृत्तीवेतन रुपये ३ हजार करावी, मोलकरीण यांच्या पाल्यांना शिक्षणात सवलत द्यावी, केंद्र सरकारने मंजूर केलेला असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा कायद्याचा लाभ घरकामगारांना द्यावा अश्याही मागण्या करण्यात आल्या आहेत, हे ही खरे काय,

(४) असल्यास, घरेलू कामगाराच्या विविध मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) होय खरे आहे.

(३) होय खरे आहे.

(४) दि. १०/१०/२०१७ रोजी केंद्र सरकारने घरेलु कामगारांच्या बाबत प्रसिद्ध केलेल्या राष्ट्रीय धोरणांच्या मसुद्यावर केंद्र शासनाचा अंतिम निर्णय झालेला नाही.

दि.२७/३/२०१५ रोजीच्या अधिसुचनेद्वारे विकास आयुक्त (अ.का) कामगार यांची एक सदस्य मंडळ या नात्याने नियुक्ती झालेली आहे. घरेलु कामगारांसाठी खालील लाभ देण्यात येत आहे ;-

१) मृत घरेलु कामगारांच्या कायदेशीर वारसांस अंत्यविधी सहाय्य रु २०००

२) घरेलु कामगारांस २ अपत्य पर्यंत प्रत्येक प्रसुती करीता रु ५००० इतकी मदत देण्यात येत आहे.

३) दि. ३१/७/२०१४ पर्यंत ज्या नोंदीत घरेलु कामगारांनी वयाची ५५ वर्ष पुर्ण झालेली अशा नोंदीत घरेलु कामगारांना सन्मानधन योजनेअंतर्गत प्रत्येकी रू १००००

आमआदमी विमा योजनेअंतर्गत देण्यात येणारे लाभ :-

१) लाभार्थांचा नैसर्गिक मुत्यु ओढवल्यास त्यांच्या वारसांस रु३००००

२) लाभार्थांचा अपघाती मुत्यु ओढवल्यास त्यांच्या वारसास रु ७५०००

३) लाभार्थास अपघातमुळे कायम स्वरुपी संपुर्ण अपंगत्व आढलल्यास त्यास रु. ७५०००

४) लाभार्थांस अंशत: अपंगत्व आल्यास त्यास रु. ३७५००

५) लाभार्थांच्या मुलींच्या शिक्षणाकरीता शिक्षा सहयोग योजनांअतर्गत इयत्ता ९ ते १२ करीता आय.टी.आय कोर्स करीत असल्यास व दर वर्षी उत्तीर्ण असल्यास पाल्यांस दर तिमाही रू. ३०० इतकी रक्कम प्रत्येकी दिली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीरामपूर शहर (जि.अहमदनगर) येथील वॉर्ड नंबर २ मध्ये गोवंश मांस जप्त केल्याबाबत

(३३) ११७२८१ (३०-०७-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) शहरातील वॉर्ड नंबर २ मध्ये पोलीसांनी दोन ठिकाणी छापा टाकून २९ गोवंश जनावरांचे चार हजार किलो मांस जप्त केल्याचे दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, सदर बाबत श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.८९/२०१८ नोंदविण्यात आला असून महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा कलम ३, ५, ५ (क) प्रमाणे गुन्हा दाखल करुन सदर गुन्ह्यातील ८ आरोपींना अटक करण्यात आले आहे. आर.सी.सी. नं. १६७/२०१८ अन्वये मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथे कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत

(३४) ११७६६८ (३०-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक येथे कौशल्य विद्यापीठाची निर्मिती करण्याकरिता आवश्यक पायाभूत सुविधा व पोषक वातावरण उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक येथे कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२४-१०-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्यात कौशल्य विद्यापीठांची स्थापना करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सार्वजनिक कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०१८ चे प्रारुप तयार करण्यात आले असून त्यास मा.मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे. सदर अधिनियमास मा.मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर राज्यात कौशल्य विद्यापीठे स्थापन करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात अवैध प्रवासी वाहतूक सुरू असल्याबाबत

(३५) ११८३४६ (२५-०७-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात अवैध प्रवासी वाहतूक सुरू असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच टेम्पो, जीपसह इतर मालवाहू वाहनांच्या टॉपवर बसून प्रवासी वाहतूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही अवैध प्रवासी वाहतूक रोखण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) नाशिक ग्रामीण घटकात प्रवाशांची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर माहे मे, २०१८ ते जुलै, २०१८ या कालावधीत मोटार वाहन कायदा कलम ६६(१), १९२ अन्वये केसेस केलेल्या आहेत. त्यांचेकडून मा.न्यायालयात रु.१,५२,५००/- इतका दंड वसूल करण्यांत आला आहे. तसेच जी वाहने नेहमी अवैध प्रवासी वाहतूक करतांना अशा एकूण १७६ वाहनांवर निलंबनाची कारवाई करण्यांत आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

माळीवाडा (अहमदनगर शहर) परिसरात कुरिअर फर्ममध्ये झालेल्या क्रुड बॉम्ब स्फोटाच्या तपासाबाबत

(३६) ११८६६९ (२५-०७-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर शहरातील माळीवाडा परिसरात कुरिअर फर्ममध्ये माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या क्रुड बॉम्ब स्फोटाचा तपास दहशतवाद विरोधी पथकाकडे देण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी किती आरोपींना अटक करण्यात आली आहे,
(३) असल्यास, त्यांचेवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) अद्याप कोणत्याही आरोपीस अटक करण्यात आलेले नाही.
(३) सदर प्रकरणी अज्ञात आरोपीविरुध्द कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे गु.र.नं.११२/२०१८ कलम ३०७, ३०८, ३३७, ३३८, ४४०, ४२७ भादंवि सह कलम ३,४ भारतीय स्फोटक पदार्थ अधिनियम १९०८ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

साकोली (जि.भंडारा) तालुक्यातील उकारा शिवारातील हॉटमिक्स प्लांटच्या ऑईल (एल.डी.ओ.) टँकमधील गाळ काढताना दोन मजुरांचा झालेला मृत्यु

(३७) ११९०७५ (३०-०७-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकोली (जि.भंडारा) तालुक्यातील चारगाव फाट्याजवळ उकारा शिवारातील हॉटमिक्स प्लांटच्या ऑईल (एल.डी.ओ.) टँकमधील गाळ काढताना दोन मजुरांचा जागीच मृत्यू तर एक मजूर जखमी झाला असल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच मृतांच्या कुटूंबियांना व जखमींना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) : (१) हे अंशत: खरे आहे.

मे. एस.के.मेहता ॲण्ड कंपनी, चारगाव फाट्याजवळ, ता.साकोली, जि.भंडारा येथे दि.०१/०४/२०१८ रोजी एल.डी.ओ. इंधन टँकमधील गाळ काढण्याचे काम करित असतांना दोन मजूरांचा जागीच मृत्यू झाला असून एक मजूर जखमी झाला आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करुन पोलीस निरिक्षक, साकोली यांनी अपघाताबाबत एफ.आय.आर.क्र.११३/१८,दिनांक १३.०४.२०१८ नोंदवून जबाबदार व्यक्तींच्या विरोधात भारतीय दंड संहिता, कलम ३०४ व ३४ नुसार गुन्हा नोंदविला आहे. कंपनीचे प्लांट ऑपरेटर श्री.अल्ताफ शहजाद शेख व श्री.राहुल मनोहर गणविर या दोन आरोपींची नावे निश्चित करण्यात आलेली आहेत.

आस्थापना मालकाद्वारे मृत कामगारांच्या वारसदारांना प्रत्येकी रुपये २ लाख इतकी रक्कम धनाकर्षाद्वारे दिनांक ०३.०४.२०१८ व दिनांक ०४.०४.२०१८ रोजी देण्यात आलेली आहे. तसेच कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत एका कामगाराच्या वारसदारांनी कामगार न्यायालय, नागपूर येथे दावा दाखल केला असून दुसऱ्या कामगारांच्या वारसदारांनाही असा दावा दाखल करण्याचे सुचित केले आहे. तसेच या अपघातात मृत पावलेल्या श्री.अनामिक उके या नियमित कामगाराच्या दोन अज्ञान मुलांना ते सज्ञान होईपर्यंत प्रति माह रु.५,५००/- इतकी रक्कम देण्याचे व त्यानंतर मयत कामगाराच्या पत्नीस रु.२,०००/- प्रति माह तहयात देण्याचे आस्थापना मालकाने मान्य केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

खोणी गावात (डोंबिवली,जि.ठाणे) अनधिकृत स्फोटके विक्री करणा-यांना अटक केल्याबाबत

(३८) ११९२९४ (३०-०७-२०१८). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवलीपासून ६ कि.मी. अंतरावरील खोणी गावात अनधिकृतपणे स्फोटकांची विक्री होणार असल्याची माहिती गुन्हे शाखा, बॉम्ब शोधक व नाशक पथक यांना मिळाल्यानंतर त्यानुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(२) असल्यास, अनधिकृत स्फोटकांची विक्री करणाऱ्या किती व्यक्तींना अटक करण्यात आली आहे,

(३) असल्यास, अटक करण्यात आलेल्यांकडून कोणती स्फोटके पोलीसांनी जप्त केली आहे व ही स्फोटके कोणत्या कारणाकरिता पुरविण्यात येणार होती याबाबतचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१८) : (१) सदर प्रकरणी मानपाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ३४/२०१८ भादवि कलम २८६, ३४ सह भारतीय स्फोटक पदार्थाचा अधिनियम १९०८ मधील कलम ५ व ६ प्रमाणे दिनांक १५/०४/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) एकुण ३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सध्या यापैकी २ आरोपी जामीनावर मुक्त असून १ आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे.

(३) अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून जिलेटीन व ईलेक्ट्रीक डिटोनेटर स्फोटके जप्त केली आहे. सदर स्फोटकाबाबत आरोपी क्र.१ याने खदानीचे ठिकाणी ब्लास्टींग करणे करीता जिलेटीन व डिटोनेटर कोठे मिळतात याबाबत आरोपी क्र.३ याचेकडे चौकशी केली असता त्याने त्याचेकडील अनधिकृतरित्या साठवून ठेवलेले गुन्ह्यातील जप्त जिलेटीन व डिटोनेटर आरोपी क्र.१ यास दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

(४) सदर प्रकरणी मानपाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ३४/२०१८ भादवि कलम २८६, ३४ सह भारतीय स्फोटक पदार्थाचा अधिनियम १९०८ मधील कलम ५ व ६ प्रमाणे दिनांक १५/०४/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्हाच्या संकेतस्थळावर खासदार व आमदारांचे छायाचित्रासह अद्ययावत माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत

(३९) ११९३३५ (२५-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहितीचा अधिकार कायद्यातील कलम ४ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने वेळोवेळी परिपत्रक काढून कठोर कार्यवाही करण्याची ताकीद दिलेली असतांनाही बुलढाणा जिल्हा संकेतस्थळावर अद्ययावत माहितीसह खासदार व आमदारांचे छायाचित्र सुध्दा उपलब्ध नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१८) : (१)अंशत: खरे आहे. बुलढाणा जिल्हा संकेतस्थळावर जिल्ह्यातील मा. खासदार व मा.आमदार यांची अद्ययावत नावे त्यांच्या मतदारसंघासह उपलब्ध आहेत,

आता सर्व मा.खासदार व मा. आमदार यांची छायाचित्रे सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

(२) निरंक

(३) निरंक

मु.पो.नाणेकरवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील ओबीएसजी प्रा.लि.या कंपनीतील महिला कामगाराचा अपघात झाल्याबाबत

(४०) ११९४६६ (३०-०७-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.नाणेकरवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील ओबीएसजी प्रा.लि.या कंपनीत दिनांक ८ डिसेंबर, २०१७ रोजी श्रीमती सीमा विश्वंभर राठोड या कामगार महिलेचे केस व्हॅक्यूम क्लिनरमध्ये अडकून १६५ टाके घालावे लागले, या झालेल्या अपघाताबाबतची तक्रार मु.पो.चाकण (जि.पुणे) पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १३ जानेवारी २०१८ रोजी वा त्या सुमारास दाखल केल्यानंतर कंपनी व्यवस्थापकासह सुपरवायजर व सुरक्षा अधिकारी अशा तीन व्यक्तींविरुध्द एक महिन्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत कंपनीने कामगारांना पुरविण्यात येणारी आवश्यक ती सर्व सुरक्षिततेची साधने न पुरविणे, कामगारास दवाखान्यामध्ये दाखल न करणे, त्याच्या औषधोपचाराचा खर्च न करणे इ. अनेक गंभीर गुन्हे ओबीएसजी प्रा.लि.कंपनी व्यवस्थापनाकडून घडूनही त्यांचेविरोधात कारवाईस हेतूत: विलंब, अक्षम्य टाळाटाळ चाकण पो.ठाण्याच्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले व तद्नुसार या प्रकरणी दोषी आढळणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) :
(१),मु.पो.नाणेकरवाडी (ता.खेड, जि. पुणे) येथील ओबीएसजी प्रा.लि. या कारखान्यात दि. ०८/१२/२०१७ रोजी श्रीमती सीमा विश्वंभर राठोड या महिला कामगारास झालेल्या अपघाताची माहिती औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, संचालनालयास प्रसारमाध्यमांकडून मिळाल्यानंतर संबंधित अधिका-यांनी दि. १५/०१/२०१८ रोजी भेट देउन चौकशी केली. या अपघाताची तक्रार या संचालनालयात प्राप्त झालेली नव्हती. चौकशीत आढळून आलेल्या चार प्रकारच्या भंगाकरीता भोगवटादाराविरुध्द मा. अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी पुणे यांच्या न्यायालयात खटला दिनांक १२/०४/२०१८ रोजी दाखल करण्यात आला.
(२) सदर अपघातामध्ये महिला कामगार जमीन झाडत असताना तिचे केस कारखान्यातील ट्रॉब मशिनच्या फिरणा-या स्टॉक बार ला गुंडाळले गेले व सर्व केस निघून आले. त्यामुळे त्या गंभिर जखमी झाल्या. या संदर्भात विना परवाना कारखाना चालविणे यासाठी महाराष्ट्र कारखाने नियम ४(४) च्या भंगाबाबत, नकाशे न मंजूर करूण घेणे यासाठी महाराष्ट्र कारखाने नियम ४(१)(अ)(ब)(क) च्या भंगाबाबत आणि ट्रॉब मशिनच्या धोकादायक भागास सुरक्षा गार्ड नसल्यामुळे कारखाने अधिनियम १९४८ चे कलम २१(१)(iii) च्या भंगाबाबत आणि अपघाताची माहिती न दिल्यासंदर्भात महाराष्ट्र कारखाने नियम ११५ (१) व ११५ (२) च्या भंगाबाबत मा. अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी पुणे यांच्या न्यायालयात खटला क्र. २६२४७/१८, दि. १२/०४/२०१८ रोजी दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर अपघाताची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, पुणे येथील अधिका-यांनी केलेली आहे. व संबंधित दोषी भोगवटादारावर न्यायालयात खटला दाखल केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यात गोवंशाची तस्करी केली जात असल्याबाबत

(४१) ११९५१७ (३०-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गोहत्या बंदी कायदा लागू असताना यवतमाळ जिल्ह्यात गोवंशाची तस्करी केली जात असल्याची माहिती माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपुरातून या अवैध व्यवसायाचे नेटवर्क सुरू असून यवतमाळ जिल्हा पोलीस दलातील काही अधिकारी या तस्करीला पाठिंबा देत असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधित दोषी तस्करी करणाऱ्या दोषींविरुद्ध व अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०१८) :(१) व (२) हे खरे नाही.
(३) यवतमाळ जिल्ह्याच्या सिमेलगत तेलंगणा राज्याची सिमा लागून असल्याने प्राण्यांना निर्दयतेपणे वाहनात कोंबून अवैधरित्या वाहतूक करणा-या २२ आरोपीतांविरुध्द एकूण ७ गुन्हे नोंदविण्यात येऊन ५७,९३,७००/- रुपये इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे व आरोपींना अटक करण्यात येऊन पुढील तपास करण्यात येत आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील पोलीस दलातील पोलीस अधिकारी या तस्करीला पाठींबा देत असल्याची कोणतीही माहिती समोर आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील स्वांतत्र्य सैनिकांचे मानधन रुपये २००० करण्याबाबत

(४२) १२०७०९ (२६-०७-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्वांतत्र्य सैनिकांना सध्या मिळत असलेले मानधन खूपच कमी असल्यामुळे त्यांना स्वत:चा व कुटूंबाचा तसेच औषधांचा खर्चही भागत नसून त्यांची उपासमार होत असल्याने त्यांचे मानधन २००० रुपये करण्याकरिता संबंधितांकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही अद्याप स्वातंत्र्य सैनिकांच्या मानधनात वाढ करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वांतत्र्य सैनिकांचे मानधन रुपये २००० करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१८) : (१) हे खरे नाही.

सध्या राज्य शासनाकडून राज्याच्या स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन (मानधन) धारकांना शासन निर्णय क्र.निवृवे २०१२/प्र.क्र.११९/२०१२/स्वासैक-१, दि.३/९/२०१४ नुसार

दि.२/१०/२०१४ पासून दरमहा रू.१०,०००/- इतके निवृत्तीवेतन अदा केले जाते.तर केंद्र शासनाच्या स्वातंत्र्य सैनिक पेन्शनधारकांना केंद्र शासनाची रू.२४,०००/- तसेच राज्याची अतिरिक्त रू.५००/- एवढी पेन्शन (शासन निर्णय दिनांक २४/१०/१९९४) देण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उरळ (ता.बाळापूर,जि.अकोला) पोलीसांच्या हद्दीतील परिसरात गोवंशाची चोरी करणारी टोळी सक्रिय असल्याबाबत

(४३) १२११४० (३०-०७-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरळ (ता.बाळापूर,जि.अकोला) पोलीसांच्या हद्दीतील शिंगोली, कळंबा, हातरुण, बोरगांव व हाता आदी परिसरात गोवंशाची चोरी करणारी टोळी सक्रिय झाली असून कळंबी (बु.) येथील शेतक-यांचे गाय,वासरु चोरीला गेल्याची घटना माहे मे,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात अनेक गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकारणांची चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) पो.स्टे. उरळ, गु.र.क्र. ११२/२०१८ भा.द.वि. कलम, ३७९,३४ अन्वये गुन्हा नोंद करुन आरोपी १) शेख बिसमिल्ला शेख शफि व २) शेख बिराम शेख रशीद यांस अटक करुन मेमोरंडम पंचनाम्याप्रमाणे गायीच्या विल्हेवाटीद्वारे प्राप्त झालेले रुपये ५०००/- जप्त करण्यात आले आहेत व तसेच गु.र.क्र. ११४/२०१८ भा.द.वी. कलम, ३७९,३४ अन्वये गुन्हा नोंद करुन आरोपी १) मो. युसुफ शेख अब्दुल २) शे. मेहबुब शे. इसमईल व ३) मो. मुजीब मो. सलीम यांस अटक करुन मेमोरंडम पंचनाम्याप्रमाणे गायीच्या विल्हेवाटीद्वारे प्राप्त झालेले रुपये ५०००/- जप्त करण्यात आले व आरोपी शे. सोहेल शे. युसुफ व वसीम हे दोन आरोपी फरार असून त्यांचा शोध घेणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) कारखान्यांतील कामगारांच्या व तेथील परिसरातील भागाच्या सुरक्षिततेबाबत

(४४) १२२४६१ (३०-०७-२०१८). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.मनोहर भोईर (उरण) श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील विविध भागात शेकडो कारखाने असून या कंपनीमध्ये काम करणा-या कामगारांची व परिसरातील भागाच्या सुरक्षिततेबाबत कारखान्यांकडून शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केले जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) ढेकू औद्योगिक वसाहतीतील एका ऑईल कंपनीला दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागली असून एखादा प्लांट उभारताना सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच प्लांटमध्ये अपघाताच्यावेळी बाहेर जाण्यासाठी सुरक्षित मार्ग असावा याबाबत कुठलेही नियम सदर कंपनीकडून पाळले गेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ढेकू येथील आग लागलेल्या ऑईल कंपनीबाबत अनेकदा कंपनीतील अधिका-यानी संबंधीत शासकीय विभागाकडे तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष केले गेले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) : (१), (२), (३), (४) व (५)

खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) ढेकू औद्योगिक वसाहतीतील एक उद्योगघटक प्रिमियर पेट्रोकेम या ऑईल कंपनीला दि.८ एप्रिल, २०१८ रोजी आग लागली होती. तथापि, कंपनीतील अधिकाऱ्यांमार्फत शासकीय विभागाकडे याबाबत कोणतीही तक्रार सादर करण्यात आलेली नाही.

या उद्योगघटकात २० पेक्षा कमी कामगार असल्यामुळे कारखाने अधिनियम, १९४८ च्या तरतूदी लागू होत नाहीत.

शिवना (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) परिसरात मोठ्या प्रमाणात शाळाबाह्य मुले बालमजूरी करीत असल्याबाबत

(४५) १२२५६९ (३०-०७-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवना (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) परिसरात मोठ्या प्रमाणात शाळाबाह्य मुले बालमजूरी करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील बालकामगार मुक्तीची मोहीम राबवून जनजागृती व या बालकामगारांना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१८) : (१) हे खरे नाही,
शिवना परिसरात शाळाबाह्य मुले शैक्षणीक सर्वेक्षणात आढळून आले नसल्याचे गट शिक्षण अधिकारी यांनी दिनांक २२.०६.२०१८ च्या पत्रान्वये कामगार उप आयुक्त, औरंगाबाद यांना कळविले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यात गुन्हेगारीचे वाढते प्रमाण

(४६) १२२६४० (२५-०७-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पालघर या नवीन जिल्ह्याची एकूण लोकसंख्या सुमारे २९ लाखांपेक्षा जास्त असून पालघर जिल्हा ग्रामीण पोलीसांच्या कार्यक्षेत्रात पालघर, विक्रमगड, मोखाडा, डहाणू, तलासरी, वाद, जव्हार आणि वसई अशी ८ तालुके येतात, यांपैकी वसई आणि पालघर तालुक्यांची लोकसंख्या झपाट्याने वाढत चालल्यामुळे गुन्हेगारीचेही प्रमाण वाढत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार दिनांक १६ मार्च ते १६ एप्रिल, २०१८ या महिन्याभराच्या कालावधीत ३ खून, २० बलात्कार आणि अपहरणाचे ३९ गुन्हे दाखल झाले असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१८) : (१), (२) व (३) पालघर जिल्ह्यात नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत असुन लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. दि. १६ मार्च, २०१८ ते १६ एप्रिल, २०१८ या महिन्याभराच्या कालावधीत ६ खून, २८ बलात्कार आणि अपहरणाचे ६० गुन्हे दाखल आहेत.

पालघर जिल्हयात सतर्कतेसाठी दिवस व रात्री पेट्रोलिंग नेमण्यात येत असून पोलीस ठाण्याच्या हद्दीत अचानकपणे कोबिंग व नाकाबंदी लावण्यात येत असुन संशयित वाहने, इसम तपासण्यात येतात. तसेच जिल्हयातील पोलीस ठाणे हद्दीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. शांतता व मोहल्ला कमिटीच्या बैठका घेऊन कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यातील रिक्त पदी सक्षम अधिकारी वर्गाची नियुक्ती करणेबाबत

(४७) १२२८२८ (२६-०७-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निती आयोगाने देशामधील मागासलेल्या जिल्हयांमध्ये उस्मानाबाद जिल्हयाचा समावेश केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयास सक्षम करण्यासाठी उस्मानाबाद जिल्हयामध्ये महत्वाच्या वरिष्ठ अधिकारी वर्गाची कमतरता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उस्मानाबाद जिल्हा सक्षम करण्यासाठी रिक्त पदावर सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्र व्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उस्मानाबाद जिल्हयातील रिक्त पदांवर सक्षम अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१८) : (१) होय, हे खरे आहे,

(२) हे अशंत: खरे आहे,

(३) उस्मानाबाद जिल्हा सक्षम करण्यासाठी रिक्त पदांवर सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दि.२८ मे, २०१८ रोजी लेखी पत्रव्यवहार केला होता.

(४) व (५) उस्मानाबाद जिल्हयातील उप जिल्हाधिकाऱ्यांच्या १२ पदांपैकी ९ पदे भरली असून ३ पदे रिक्त आहेत. त्यामध्ये उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद व विशेष भू संपादन अधिकारी क्र.२, उस्मानाबाद ही पदे रिक्त आहेत.

तहसीलदार संवर्गातील १३ पदांपैकी १० पदे भरलेली असून ३ पदे रिक्त आहेत. त्यामध्ये तहसीलदार, तुळजापूर मंदीर देवस्थान, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी आणि तहसीलदार (संजय गांधी योजना) जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद ही पदे रिक्त आहेत. उप जिल्हाधिकारी आणि तहसीलदार मधील रिक्त पदे भरण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

मुख्याधिकारी संवर्गातील मंजूर १० पदांपैकी ७ पदे भरली असून ३ पदे भरण्याची कार्यवाही चालु आहे.

प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उस्मानाबाद (PD DRDA), जिल्हा परिषदेतील कार्यकारी अधिकारी (बांधकाम), शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा संवर्धन अधिकारी ही पदे भरण्यात आली असून याशिवाय कृषी विभागातील प्रकल्प संचालक (आत्मा) तसेच तालुका कृषी अधिकारी, उस्मानाबाद ही पदे भरण्यात आलेली आहेत. तर उर्वरित कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे), कार्यकारी अभियंता, (पाणी पुरवठा), शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण), मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद, अधीक्षक अभियंता, लातुर आणि कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद ही पदे भरण्याबाबत संबंधित विभागाकडून / प्राधिकरणाकडून कार्यवाही चालु आहे.

औरंगाबाद जिल्ह्यात मजूरांच्या नोंदणीसाठी विशेष मोहिम राबविण्याबाबत

(४८) १२३३३५ (२६-०७-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात प्रत्यक्षात नोंदणी न झालेल्या बांधकाम कामगारांची संख्या किमान एक लाखापेक्षा अधिक असल्याचे दिनांक १ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे हे कामगार शासनाच्या विविध योजनांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने येथे मजूरांच्या नोंदणीसाठी विशेष मोहिम हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) : (१)हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यातील दिनांक २३.२.२०१८ ते १०.४.२०१८ या कालावधीत बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरीता विशेष नोंदणी अभियान राबविण्यात आले असून त्यामध्ये १२८०२ बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोले (जि.अहमदनगर) येथील पोलीस ठाणे व कर्मचारी वसाहत इमारत बांधकामाकरीता निधी उपलब्ध होणेबाबत

(४९) १२४२३४ (२६-०७-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) येथील तालुका पोलीस ठाणे इमारत व कर्मचारी वसाहत जीर्ण झाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी नविन इमारतीच्या बांधकामाकरीता दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे निधीची मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, नविन पोलीस ठाणे इमारत व कर्मचारी वसाहतीचे बांधकाम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) अकोले पोलीस ठाण्याची प्रशासकीय इमारत व कर्मचारी वसाहतीचे बांधकाम करण्याकरिता जुने ग्रामीण रुग्णालयाची जागा पोलीस विभागास वर्ग होण्याबाबत पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांनी जिल्हाधिकारी, अहमदनगर कार्यालयास पत्रव्यवहार केलेला आहे. सदरची जागा पोलीस विभागास हस्तांतरित झाल्यानंतर अकोले पोलीस ठाण्याची प्रशासकीय इमारत व कर्मचारी वसाहतीचे बांधकामाचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे पाठविण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कामगार कल्याणकारी मंडळामध्ये हुपरी (जि.कोल्हापूर) सह १० गावातील चांदी कारागीरांचा समावेश करण्याबाबत

(५०) १२६३४६ (०४-०८-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने यंत्रमाग, विडी व बांधकाम कामगारांच्या बरोबरच १२३ उद्योगातील कामगारांसाठी कल्याणकारी मंडळाची घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंडळामध्ये या परिसरातील हजारो चांदी कारागिरांचा समावेश करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर योजनेपासून हुपरी सह १० गावातील हजारो चांदी कारागीर वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हुपरी सह १० गावातील हजारो चांदी कारागिरांना वंचित ठेवण्यामागची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उपरोक्त हजारो चांदी कारागिरांना समावून घेण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१८) : (१) राज्यामध्ये यंत्रमाग, विडी व बांधकाम कामगारांच्या बरोबरच १२२ उद्योगातील कामगारांसाठी असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ दि. ३/४/२०१८ रोजीच्या अधिसुचनेद्वारे गठीत करण्यात आले आहे.
(२), (३), (४), (५) केंद्र शासनाने असंघटित कामगार विधेयक २००३ अन्वये १ते १२२ व्यवसायामध्ये काम करणा-या कामगारामंध्ये रत्नांवरील काम (जेम कटिंग) तसेच सोनार काम करणा-या कामगारांचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच सुरक्षा मंडळाच्या बैठकीमध्ये घेण्यात येणा-या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.